Tue, 30 Jan-18; Vrutta Manas - Mumbai; Size : 59  sq.cm.; Circulation:-; Page : 3

# रिलायन्सच्या नवीन वेबसाईटचा शुभारंभ

मुंबई, मंगळवार : रिलायन्स सिक्युरिटीज लिमिटेड या रिलायन्स कॅपिटल लिमिटेडच्या ब्रोकिंग आणि वितरण शाखेने रिटेल गुंतवणूकदारांसाठी नवीन वर्षाची भेटवस्तू म्हणून नवीन वेबसाईट www.reliancesmartmoney.com चा शुभारंभ केला आहे. यामुळे रिटेल गुंतवणूकदारांना तीन क्लिकमध्ये कोणतीही वित्तिय उत्पादने ऑनलाईन खरेदी करता येणार आहे. या वित्तिय सेवांसाठी अशा स्वरूपाचे पहिले पोर्टल असेल, ज्यावर रिटेल गुंतवणूकदारांच्या सर्व वित्तिय गरजांसाठी वन स्टॉप शॉप (एकाच छताखाली सर्व पर्याय)ची सोय राहणार आहे. रिलायन्सचा कॅपिटेलचा उद्देश वित्तिय सेवांसाठी भारताची सर्वात मोठी डिजिटल मार्केटप्लेस निर्माण करण्याचा आहे. या वेबसाईटवर सुरूवातीला २२ हजारांहून अधिक उत्पादने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुढच्या वर्षी ही संख्या वाढून ५० हजारांच्यावर जाणार आहे.